P.V.G.'s

# Muktangan English School & Jr. College,

44, Vidyanagari, Parvati, Pune - 411009.

## Terminal Examination (2025-26)
## Standard - IX

Subject : Marathi | Marks : 80

Date : 4 | 10 | 2025 | Time : 1.45 pm to 4.45 pm

## विभाग १ – गद्य (१८)

**प्र.१अ) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

खेळांचे विशाल मैदान, त्याभोवतालचे प्रचंड प्रेक्षागार, रहदारीसाठी मुद्दाम बांधलेल्या अनेक सडका, लोहमार्ग, पुरुष व स्त्री–खेळाडू यांच्या निवासासाठी बांधलेल्या असंख्य खोल्या असलेल्या इमारती, वसतिगृहे, प्रेक्षकांच्या श्रमपरिहारासाठी सुसज्ज अशी विशाल उपाहारगृहे–असे हे एक मोठे गावच असते! याला 'ऑलिंपिक व्हिलेज' असे म्हणतात. 'ऑलिंपिक व्हिलेज' वसवण्याची कल्पना इ.स. १९५६ मध्ये मेलबोर्न येथे मांडण्यात आली. पहिले 'ऑलिंपिक व्हिलेज' तिथलेच. ऑलिंपिक सामने दर चार वर्षांनी होतात. हे सामने पाच दिवस चालत. इ.स.पूर्व ७७६ मध्ये हे सामने झाल्याची पहिली नोंद ग्रीस देशाच्या इतिहासात सापडते. त्यावेळी स्पर्धेत यशस्वी होणाऱ्या खेळाडूंचा, ऑलिव्ह वृक्षाच्या फांदीची माळ घालून, गौरव करण्यात येत असे. ग्रीस देशातील अनेक शहरे परस्परांतील भेदभाव विसरून या यशस्वी स्पर्धकांचे प्रचंड स्वागत करत. या सामन्यांतील खेळाडूंना राष्ट्रीय सणसमारंभाच्या वेळी मानाचे स्थान मिळत असे. पुढे ग्रीक सत्तेचा ऱ्हास झाला आणि त्याबरोबर इ.स. पूर्व ३९४ मध्ये हे सामने बंद पडले.

मैत्रीचा मंत्र सांगणाऱ्या या ऑलिंपिक सामन्यांची त्यानंतर इ.स. १८९४ साली आधुनिक जगाला आठवण झाली. त्या वर्षी फ्रान्स देशात एक 'ऑलिंपिक काँग्रेस' भरवण्यात आली होती. त्या काँग्रेसला अनेक राष्ट्रांचे प्रतिनिधी हजर होते. कुबर टीन नावाच्या फ्रेंच क्रीडातज्ज्ञाने या काँग्रेसमध्ये ऑलिंपिक सामन्यांचे पुनरुज्जीवन केले. शरीरसंपदा वाढवण्यासाठी, बलसंवर्धन करण्यासाठी आणि प्रामुख्याने देशादेशांतील मैत्री वाढून त्यांच्यात मित्रत्वाची स्पर्धा व्हावी यासाठी प्राचीन ऑलिंपिक सामन्यांप्रमाणेच यापुढे आंतरराष्ट्रीय क्रीडास्पर्धा भरवाव्यात असे ठरले. १८९६ पासून ऑलिंपिक सामने दर चार वर्षांनी वेगवेगळ्या देशांत भरवले जातात. त्या निमित्ताने जगात सद्भावना, समता, मैत्री, विश्वबंधुत्व, शिस्त व ऐक्य या भावना वाढीस लागतात.

**अ) आकृतिबंध पूर्ण करा. (आकृती काढणे आवश्यक)** **(१)**



**ब) कारण लिहा.** **(१)**

१) इ.स. पूर्व ३९४ मध्ये ऑलिंपिक सामने बंद पडले.

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२)**

१) ऑलिंपिक काँग्रेस कोणत्या देशात भरवण्यात आली?

२) ग्रीस देशात स्पर्धेत यशस्वी होणाऱ्या खेळाडूंचा गौरव कसा करण्यात येत असे?

**ड) स्वमत–** **(३)**

'विद्यार्थ्यांच्या जीवनात खेळाला महत्त्व असावे' का, ते तुमच्या शब्दांत लिहा.

**ब) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

सुरुवाती सुरुवातीला दिव्याच्या प्रयोगाबाबतची प्रत्येक कल्पनाच योग्य आहे असे एडिसनला वाटायचे; पण प्रयोग करून पाहिल्यावर त्यातील फोलपणा जाणवायचा. केलेला प्रत्येक प्रयोग आणि त्यातून काय आढळले याची पद्धतशीर नोंद वह्यांमधून ठेवली. अशा त्याच्या प्रयोगाच्या दोनशे वह्यांची चाळीस हजार पाने भरून गेली. एडिसनचे काही टीकाकार त्याला म्हणायचे, ''हा सगळा खटाटोप फुकटचा गेला म्हणायचा! कारण यातल्या बहुतेक नोंदी या फसलेल्या प्रयोगांच्या आहेत.'' या टीकाकारांना एडिसनने उत्तर दिले आहे, ''मी जे हजारो प्रयोग केले ते फसले तरी फुकट गेले असे कसे म्हणता येईल? निदान माझ्यानंतर प्रयोग करणाऱ्यांना हेच प्रयोग पुन्हा करून पाहण्याची गरज नाही. त्यांचे ते श्रम आणि वेळ वाचला हा फायदाच नाही का?''

सतत दहा ते बारा वर्षे प्रयोग करून पाहिल्यानंतर दिव्यामध्ये फिलॅमेंटसाठी वापरण्यात येणाऱ्या टंगस्टन धातूचा प्रयोग यशस्वी झाला. इतका महत्त्वपूर्ण शोध लागला: पण तो लोकांना माहिती कसा व्हावा? त्याच्या डोक्यात एक कल्पना आली. मेन्लो पार्क येथील घराभोवती त्याने प्रचंड मोठा मांडव उभारला. त्या ठिकाणी नाना प्रकारच्या दिव्यांची आकर्षक रोषणाई केली. झाडात, झुडपात, अंगणात, गच्चीवर किंबहुना जिथे जागा मिळेल तिथे वाटाण्यापासून भोपळ्यापर्यंतच्या विविध आकाराचे आणि रंगाचे दिवे लावण्यात आले. तो दिवस होता २१ ऑक्टोबर १८७९ चा. घराभोवतीचा दिव्यांचा झगमगाट पाहायला सारे गावच्या गाव लोटले. एडिसनने केलेल्या या दिवाळीचा वर्तमानपत्रात आणि सगळीकडे गवगवा झाला. वर्तमानपत्रांतून दिव्याच्या शोधाची बातमी जगभर पसरली.

**अ) आकृतिबंध पूर्ण करा. (आकृती काढणे आवश्यक)** **(२)**




**आ) एका वाक्यात उत्तर लिहा.** **(१)**

दिव्यामध्ये फिलॅमेंटसाठी कोणत्या धातूचा प्रयोग यशस्वी झाला?

**इ) चूक की बरोबर ते लिहा.** **(१)**

१) वर्तमानपत्रांतून दिव्याच्या शोधाची बातमी जगभर पसरली.

२) सुरुवाती सुरुवातीला दिव्याच्या प्रयोगाबाबतची प्रत्येक कल्पना अयोग्य आहे असे एडिसनला वाटे.

**ई) स्वमत:** **(३)**

संशोधक होण्यासाठी तुम्ही स्वत:च्या व्यक्तिमत्त्वात कसे बदल कराल?

**क) खालील उतारा काळजीपूर्वक वाचून त्याखालील कृती करा.**

यंत्राचा शोध लागला आणि माणसाच्या जीवनाचा दर्जा सुधारला. सुरुवातीला यंत्रांकडे पाहण्याचा माणसाचा दृष्टिकोन हा सावध होता. भारतासारख्या देशात रेल्वेकडे लोक भुताटकी म्हणून पाहत होते. ज्या रेल्वेमध्ये बसायला लोक घाबरत त्याच रेल्वेमध्ये आता गर्दी ओसंडून वाहत असते. काळाचा महिमा असा आहे, की सुरुवातीला विरोध झालेल्या यंत्रांनी माणसाचे संपूर्ण आयुष्य व्यापून टाकले आहे. माणसाला यंत्रांची एवढी सवय व सराव झाला आहे, की यंत्रावाचून माणूस प्रत्येक पावलावर अडखळताना दिसतो. मिस्कर, ओव्हन, फ्रिज, वॉशिंग मशीन, दूरदर्शन, मोबाइल, संगणक अशा अनेक यंत्रांनी माणूस वेढलेला आहे.

भारतामध्ये संगणकाच्या प्रवेशाला लोकांचा विरोध झाला होता. आज संगणक आणि मोबाइल यांशिवाय माणसाचे जगणे अपूर्ण आहे: मात्र संगणकाच्या मदतीने किंवा 'अलेक्सा'च्या साहाय्याने आपली कामे कमी करणे किंवा सोपी करणे ही अगदी साधारण बाब झालेली दिसून येते. यंत्र माणसावर विजय मिळवतील का? या प्रश्नाचे उत्तर नाहीच असे आहे. यंत्रे कितीही 'स्मार्ट' झाली तरी माणसाच्या कल्पनाशक्ती, विचारशक्तीपुढे त्यांचा टिकाव लागणे सध्यातरी शक्य नाही.

**अ) आकृतिबंध पूर्ण करा. (आकृती काढणे आवश्यक)** **(२)**




**आ) एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२)**

१) माणसाच्या जगण्याचा दर्जा केव्हा सुधारला?

२) माणसाच्या कोणत्या गुणांपुढे यंत्रांचा टिकाव लागणार नाही?

## विभाग २ – पद्य (१६)

**कविता – व्यायामाचे महत्त्व**

व्यायाम आरोग्यदायी मित्र । हे ध्यानी ठेवावे सूत्र ।
आळस वैरी मानिला सर्वत्र । सर्वतोपरी ।।

व्यायामाविण सात्त्विक भोजन । तेहि मारी विकारी होऊन ।
व्यायामे होय अग्निदीपन । अन्नपचन सहजचि ।।

व्यायामे जडत्व जाई दूरी । व्यायामे अंगी राहे तरतरी ।
रक्तव्यवस्था उत्तम शरीरी । वाढे विचारी सजीवपण ।।

व्यायामाने सशक्त स्नानु । व्यायामे मानव होय दीर्घायु ।
व्यायामहीना पित्त, कफ, वायु । जर्जर करिती अत्यंत ।।

व्यायामे वाढे प्रतिकार शक्ति । स्वावलंबनाची प्रवृत्ति ।
व्यायामे अंगी वाढे स्फूर्ति । कार्य करण्याची ।।

**प्र. २ अ) आकृतिबंध पूर्ण करा. (आकृती काढणे आवश्यक)** (२)




**ब) योग्य जोड्या जुळवा.** (२)

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) जाई दूरी | सूत्र |
| २) वैरी मानिला | मित्र |
| ३) आरोग्यदायी | जडत्व |
| ४) ध्यानी ठेवावे | आळस |

**क) कवितेतील खालील शब्दांचे अर्थ लिहा.** (२)

१) सात्त्विक –        ३) विकार –

२) दीपन –        ४) शरीर –

**ड) स्वमत:** (२)

‘आरोग्यम् धनसंपदा’ या उक्तीतील विचारांचा विस्तार करा.

**ब) पुढील दिलेल्या मुद्द्यांच्या** आधारे कवितेचे रसग्रहण करा.

**कविता – ‘संतकृपा झाली’**

१) प्रस्तुत कवितेचे कवी / कवयित्री – (१)

२) कवितेचा रचना प्रकार – (१)

३) कवितेचा विषय – (१)

४) कवितेतील खालील ओळींचा सरळ अर्थ लिहा. (२)

‘ज्ञानदेवे रचिला पाया ।
उभारीले देवालया ।।

५) कवितेतील खालील शब्दांचा अर्थ लिहा. (१)

१) किंकर – २) रचिला –

६) कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण – (२)

## विभाग ३ – स्थूलवाचन (६)

प्र. ३ **खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे लिहा.** (६)

१) टिपा लिहा.

१) एकशिंगी गेंडा २) गेंड्याच्या सवयी

२) ‘लहान मुलांची हास्यचित्रे काढणे अवघड आहे’ याबाबत तुमचे मत लिहा.

३) ‘प्राण्यांचे गंधज्ञान’ या संकल्पनेबाबत तुमचे मत लिहा.

४) तुम्हाला आवडलेल्या कोणत्याही एका व्यंगचित्राचे तुम्ही केलेले निरीक्षण बारकाव्यांसह लिहा.

## विभाग ४ – भाषाभ्यास (व्याकरण) (१६)

**अ) खालील चौकट पूर्ण करा.** **(५)**

| | वाक्य | उपयमेय | उपमान | सामर्ध्यदर्शक शब्द | समान गुण | अलंकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | महाराणा प्रताप वाघासारखे शूर होते. | | | | | |
| २) | आईचे प्रेम म्हणजे जणू अथांग सागरच | | | | | |

**आ) खालील वाक्य लेखननियमांनुसार लिहा.** **(१)**

कोण सखु आजी? माझी कोण लागत होति ती?

**इ) समानार्थी शब्द लिहा.** **(१)**

१) आठवण – २) गैरहजर –

**ई) विरुद्धार्थी शब्द लिहा.** **(१)**

१) साक्षर × २) फरक ×

**उ) खालील शब्दांची सामान्यरूपे लिहा.** **(१)**

१) माणूस – २) तुरुंग –

**ऊ) अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखा.** **(१)**

१) आजी माझ्या जवळची होती.

२) कुणी सांगेल वेडंवाकडं चित्र काढल की ते झालं कार्टुन!

**ए) वचन बदला.** **(१)**

१) काठी – २) प्राणी –

**ऐ) खालील वाक्यांचा प्रकार ओळखा.** **(१)**

१) मुलांनो, रोज व्यायाम करा.

२) किती सुंदर किनारा आहे हा!

**ओ) लिंग बदला.** **(१)**

१) हत्ती –　　　　　　२) म्हैस –

**औ) खालील वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा. (कोणतेही २)** **(२)**

१) पाण्यासारखा पैसा खर्च करणे –

२) काबीज करणे –

३) सांत्वन करणे –

**अं) खालील वाक्यांचा काळ बदला.** **(१)**

१) अतुलने सुबक मूर्ती घडवली. (वाक्य वर्तमानकाळी करा.)

## विभाग ५ – उपयोजित लेखन (२४)

**प्र. ५ अ) पत्रलेखन** **(६)**

मा. आरोग्य अधिकारी
महानगरपालिका, पुणे

↓

विभागातील रहिवासी या नात्याने

| | | |
|---|---|---|
| रस्त्यावरील कचरापेटीच्या दुर्दशेसंदर्भात तक्राकर करणारे पत्र लिहा. | किंवा | नवीन कचरापेटीचा प्रश्न सोडविल्याबद्दल आरोग्य अधिकाऱ्याला धन्यवाद देणारे पत्र लिहा. |

**आ) खालीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** **(५)**

**१) दिलेल्या विषयावर आकर्षक जाहिरात तयार करा.**

'गिरीवन टूर्स आणि ट्रॅव्हल्स' या कंपनीची आकर्षक जाहिरात तयार करा.

**२) वृत्तांत लेखन –**

तुमच्या शाळेत साजऱ्या झालेल्या स्वच्छता अभियान कार्यक्रमाचा वृत्तांत लिहा.

**३) कथा लेखन –**

**खालील कथेचा उत्तरार्ध लिहा. तुम्ही लिहिलेल्या या कथेला योग्य शीर्षक द्या व तात्पर्य लिहा.**

सोनापूर गाव नावाप्रमाणेच सोन्यासारखे, सुंदर होते. निसर्गाने जणूकाही मुक्तहस्ताने सौंदर्य उधळले होते. या गावावर. गावातून एक नदी वाहत होती. याच छोट्याशा गावात रामू नावाच्या एक शिंप्याचे दुकान होते.

गावात एकदा सर्कस आली. सर्कशीतला हत्ती रोज नदीवर स्नानासाठी जाई. जाताना तो शिंपाच्या दुकानापाशी थांबे. शिंपी त्याला रोज काही ना काही खायला देत असे. मग हत्तीसुद्धा खूश होऊन त्याला सोंडेने सलाम करीत असे...

**इ) पुढील उतारा वाचून त्यावर प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे येतील असे पाच प्रश्न तयार करा.** (५)

भारताला विविधतेने नटलेला देश म्हटले जाते. विविधतेतील एकता भारताच्या संस्कृतीमध्ये, भौगोलिकतेमध्ये, भाषा, खाद्य, परंपरा यांमध्ये दिसून येते. भारत हा असा देश आहे. ज्यामध्ये काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत जगभरात आढळणारे विविध प्रदेश आढळतात. ज्यामध्ये वाळवंट, बर्फाळ प्रदेश, समुद्रकिनारे, डोंगरदऱ्या, जंगले, नद्या यांचा समावेश होतो. संपूर्ण भारतभर विविध राज्यांत विविध भाषा बोलणारे लोक राहतातच त्याचबरोबर मुंबई, दिल्लीसारख्या शहरांमध्ये संपूर्ण भारतभरातील विविध भाषिक लोक एकत्र राहतात. भारतातील विविध राज्यांची खाद्यसंस्कृती भिन्न आहे. ही खाद्यसंस्कृती संपूर्ण भारतभर पसरलेली दिसते. दक्षिणेची इडली वडा उत्तरेतही मिळतो. हैद्राबादची बिर्याणी, मुंबईचा वडापाव, गुजरातचा फाफडा जिबेली, कोलकाताचा रसगुल्ला हे पदार्थ साऱ्या भारतभर बनवले जातात आणि आवडीने खाल्ले जातात.

भारतातील नृत्यसंस्कृती, पेहराव यांमध्ये वैविध्यपूर्ण एकता दिसून येते. भारत हा एकमेव असा देश असेल जेथे विविध जाती, धर्मांचे लोक नवीन वर्षाचे स्वागत वेगवेगळ्या दिवशी करत असतात.

**ई) निबंधलेखन :**

**खालील विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर १५ ते २० ओळींत निबंध लिहा.** (८)

१) वर्तमानपत्रे बंद झाली तर....

सर्वांना सामावून घेणारी वाचनसंस्कृती ठप्प ...... लोकशिक्षण, लोकसहभाग बंद ....... बातम्या, मनोरंजन, बाजारभाव वाचण्याचा आनंद नाही ...... वर्तमानपत्राशी संबंधित व्यवसाय बंद....

२) मी पाहिलेली गणपती विसर्जन मिरवणूक....

कुठून निघाली ...... वेश आणि पारंपारिकता ............ शिस्तीचे पालन ........ उत्साह आणि चैतन्य .......... वाहतुकीचे नियम पालन.

३) मी शेतकरी बोलतोय...

काळी आई ........ निसर्गाचा लहरीपणा ...... हवामान, पावसावर अवलंबून व्यवसाय ...... व्यथा कष्ट–विनंती

❖❖❖